# चंद्रग्रहण पाहण्यात ढगाळ वातावरणामुळे अडथळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे चंद्रग्रहण शुक्रवारी रात्री पावसाची रिमझिम आणि ढगाळ वातावरण असतानाही शहरातील खगोलप्रेमींनी पाहिले. रात्री पावणेबारानंतर सुरू झालेले चंद्रग्रहण ढगाळ वातावरणाने सहजासहजी दिसत नव्हते. मात्र, विवेकानंद कॉलेजने एका सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार केलेल्या दुर्बिणीतून या चंद्रग्रहणाचा आनंद लुटला. शहर परिसरातील



**प्रदीर्घ चंद्रग्रहणावेळी 'ब्लडमून' पाहण्याचा आनंद देशात ठिकठिकाणी खगोलप्रेमींनी लुटला.**

हौशी मंडळींनी टेरेसवर दुर्बिणीच्या माध्यमातून चंद्रग्रहण पाहण्याचा प्रयत्न केला. मात्र, ढगाळ वातावरणामुळे ग्रहण दिसले नसल्याने त्यांची निराशा झाली.

शिवाजी विद्यापीठ परिसरातही विद्यार्थ्यांनी चंद्रग्रहण पाहण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनाही ढगाळ वातावरणाचा फटका बसला. चंद्राचा लहान आकार व **पान ७** ▶




पुढारी

# चंद्रग्रहण पाहण्यात ढगाळ वातावरणामुळे अडथळे

**(पान १ वरून)** रक्तासारख्या लाल रंगामुळे मायक्रोमून व ब्लडमून अशा विलोभनीय दृश्याची अनुभूतीही काही खगोलप्रेमींना घेता आली.

चंद्रग्रहण पाहण्यासाठी विवेकानंद कॉलेज व चित्रदुर्ग मठ येथे सायंकाळनंतर खगोल दुर्बिणी सज्ज ठेवल्या होत्या. पावसाची रिमझिम सुरू होती. तसेच ढग पूर्णपणे काळसर असल्याने हे ग्रहण दिसण्यास अडचणी येणार का, याबाबत अभ्यासकसुद्धा साशंक होते. मात्र, खगोलप्रेमींनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रहण पाहिले. सर्वसामान्य हौशी मंडळींची मात्र ढगाळ वातावरणामुळे निराशा झाली.

**खगोलप्रेमींनी रात्र जागून काढली**

ग्रहण पाहण्यासाठी खगोलप्रेमींनी रात्र जागून काढल्याचे दिसत होते. मायक्रोमून व ब्लडमून पाहून त्यावर सोशल मीडियाव[र] प्रतिक्रिया देत होते.

**शहरवासीयांना उत्सुकता**

जगातले सर्वात मोठे चंद्रग्रहण असल्याने सर्वसामान्यांनाही याबाबत उत्सुकता होती. त्यामुळे अनेकांनी हे ग्रहण पाहण्यासाठी टेरेसवर दुर्बिणीच्या माध्यमातून ग्रहण पाहण्याचा प्रयत्न केला. मात्र, हे दृश्य दिसून आले नाही.